# संविधान चौकातील उद्यानाच्या देखरेखीचे कार्य मनपाद्वारेच व्हावे

## आंबेडकरी संघटनेच्या वतीने विधी समिती सभापती ॲड. धर्मपाल मेश्राम यांना निवेदन

**नागपूर, ता. २९ :** संविधान चौकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकापुढील उद्यानाची देखभाल मनपातर्फे संविधान मार्ग नागरिक मंच या संस्थेला देण्यात आली आहे. मात्र संस्थेमार्फत या उद्यानात कोणतेही देखभाल कार्य होत नाही. करिता सदर करारनामा रद्द करून उद्यानाची देखभाल नागपूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाद्वारेच व्हावी, अशी मागणी करणारे निवेदन आंबेडकरी संघटनेच्या शिष्टमंडळाद्वारे सोमवारी (ता.२९) विधी समिती सभापती ॲड.धर्मपाल मेश्राम यांना देण्यात आले.

शिष्टमंडळात सुधीर ढोके, प्रवीण कांबळे, रंगराज गोस्वामी, महिपाल गेडाम, जलेंद्र मेश्राम, विलास शेवाळे, ज्ञानेश्वर ढेंगरे, सुरेश लोखंडे आदी उपस्थित होते.

संविधान चौकात विविध सामाजिक संस्था, राजकीय व्यक्ती, विदेशी नागरिक भेट देत असतात. त्यामुळे या जागेचे पावित्र्य राखले जावे, येथील परिसर नियमीत स्वच्छ व निटनेटके राहणे आवश्यक आहे. संविधान चौकातील उद्यानाची देखभाल मनपाने स्वत:कडेच ठेवावा या संघटनेच्या मागणीची दखल घेत विधी समिती सभापती ॲड.धर्मपाल

मेश्राम यांनी त्वरित उद्यान विभाग अधीक्षक अमोल चौरपगार यांच्याकडून सविस्तर माहिती घेत सदर करारनामा रद्द करण्याचे निर्देश दिले.